नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 18/07/2020 (शनिवार)
(सकाळ)

---

## खून

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 08 कि. मी अंतरावर मौजा गोवरी वार्ड क्र. 2 मृतकाच्या घरासमोर येथे दिनांक 17/07/2020 चे 21.45 वा. दरम्यान आरोपी नामे– सुधाकर दादारावजी अखंड, वय 40 वर्ष, रा. गोवरी, ता. कळमेश्वर जि. नागपुर याचा लहान भाऊ मृतक नामे– किशोर दादारावजी अखंड, वय 38 वर्ष, रा. गोवरी, ता. कळमेश्वर जि. नागपुर हा नेहमी दारू पिवुन शिवीगाळ करून त्रास देण्याचा सवयीचा होता. मृतक याने दारू पिवुन आरोपीला नेहमी प्रमाणे शिवीगाळ केल्याने मृतकच्या सदर त्रासाला कंटाळुन रागाचे भरात आरोपीने मृतक याच्या मागे धावत जावुन त्याचे घराचे अगंणातील लाकडी ढिगाऱ्या मधील काडी उचलुन मृतकच्या डोक्यावर मारहाण करून त्याला गंभीर जखमी करून जिवानीशी ठार मारले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संजय दादारावजी अखंड, वय 36 वर्ष, रा. गोवरी ता. कळमेश्वर जि. नागपूर, ह. मु. खुशराज सावनकर, गोरेवाडा नागपूर यांचे रिपोर्टवरून पो. स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरूद्ध कलम 302 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. मारूती मुळूक हे करीत आहे.

## विनयभंग

1) पो.स्टे. देवलापार :– दि. 17/07/2020 चे 04:00 वा. चे सुमारास फिर्यादी यांची 13 वर्षीय पिडीत मुलगी हि घरी एकटी हजर असता आरोपी नामे– अशोक गोपाल भारसखरे, वय 25 वर्ष, रा. नवेगाव चिचदा याने घरात येवून तिला सुपारी दे असे म्हटले. यानंतर आरोपीने पीडितेस अश्लील शब्दात बोलुन तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ) भादंवि. सहकलम 8/12 बाल लैंगीक अत्याचार संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि भुते 9822566180 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– दि. 16/07/2020 चे 17:00 वा. ते 17:15 वा. चे सुमारास 17 वर्षीय पिडीत/फिर्यादी ही तिच्या घराला लागुन असलेल्या शेतात शौचास गेली असता आरोपी नामे क्र. 1) सुरेश अर्जुन पडोलीया व 2) दिनेश अर्जुन पडोलीया दोन्ही रा. वाढोणा यांनी संगनमत करून पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. त्यादरम्यान पीडिता ओरडली असता तिचा भाऊ व वडील तेथे आले असता आरोपीने त्यांना हातबुक्कीने मारहाण करून पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ), 323, 506, 34 भादंवि. सहकलम 8 बाल लैंगीक अत्याचार संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि सोनाली जगताप 8421401099 या करीत आहे.

## जबर दुखापत

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत बेलोना येथे दिनांक 14/07/2020 चे 20:00 वा. ते 20.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिवाकर मारोतराव नासरे, वय 34 वर्ष, रा. नरखेड हे घरी हजर असतांना त्याचे घराचे समोरील अंगनात कुत्रे बसले असता आरोपी नामे– 1) राजेश काळबांडे, 2) संजय काळबांडे व 3) लिलाधर काळबांडे, सर्व रा. बेलोना यांनी कुत्र्याला दगड मारला. त्यामुळे फिर्यादीने आरोपीस कुत्र्याला दगड का मारला असे हटकले. याकारनावरून आरोपीने भांडण करून फिर्यादीला लोखंडी पाईपने मारहाण केल्याने फिर्यादीचे उजव्या हाताचे मधल्या बोटाला मार लागल्याने बोट फ्रॅक्चर झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 325, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक गजानन शेन्डे 8830107633 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर